महाराष्ट्र राज्य
सेंद्रिय शेती व सेंद्रिय निविष्ठा धोरण मसुदा

प्रस्तावना-

अन्नधान्याच्या उत्पादन वाढीसाठी अधिक उत्पादन देणा-या व संकरीत जाती, रासायनिक खते आणि रासायनिक किटकनाशके यांचा मोठया प्रमाणावर वापर करण्यात आला. त्यांच्या वापरामुळे पिक उत्पादनात निश्चितच वाढ झाली परंतु रासायनिक खते व किटकनाशकांच्या सततच्या वापरामुळे जमिनीचे आरोग्य बिधडणे, पिकाची उत्पादकता कमी होणे आणि उत्पादित मालाची प्रत खालावणे यासारखे दुष्परीणाम दिसू लागले. जमिनीचे आरोग्य सुधारण्यावर महापीक अभियानअंतर्गत विशेष भर देण्यात आला. राज्य शासनाने २०००-०१ पासून सेंद्रिय शेती योजना सुरु केली आहे. नंतर २००२-०३ पासून केंद्र शासनाच्या कृति आराखडयाअंतर्गत सदरची योजना अंमलात आली आहे. शासनाचा पुढाकार कृषि विभागातील अधिकारी ,कष्टकरी शेतकरी, कृषि विद्यापीठ शास्त्रज्ञ व सेवाभावी संस्था या सर्वांच्या प्रयत्नातून महाराष्ट्रात सेंद्रिय शेतीची मोठी चळवळ उभी राहीली . सेंद्रिय शेतीमध्ये उत्कृष्ट कार्य केल्या बद्दल सन २००९ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाला **"शायनिंग वर्ल्ड लिडरशिप ॲवार्ड "**या आंतरराष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांनी दि. ५ डिसेंबर २००९ रोजी गौरविण्यात आले आहे.

सेंद्रिय शेतीच्या चळवळीस अधिक चालना दिल्यास महाराष्ट्र राज्यास **"आदर्श सेंद्रिय शेती राज्य "** म्हणून ख्याती मिळविता येईल. यासाठी राज्याचे **"सेंद्रिय शेती धोरण "** आवश्यक आहे. सेंद्रिय शेती धोरण संबंधात सर्व सेंद्रिय शेती-तज्ञ, शास्त्रज्ञ, शेतकरी व सेवाभावी संस्था यांचेशी सविस्तर चर्चा करून खालील प्रमाणे सेंद्रिय शेती धोरण निश्चित करण्यात आले आहे.

सेंद्रिय शेती

सेंद्रिय शेती म्हणजे **" अशी वैविध्यपुर्ण शेती पध्दती की ज्यामध्ये पिके व पशुधन यांचे व्यवस्थापन शेतावरील व स्थानिकरित्या उपलब्ध स्त्रोतांमधून एकात्मिक पध्दतीने केले जाते." (भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली)**

सेंद्रिय शेती पध्दती म्हणजे **" अशी शेती पध्दती की, ज्यामध्ये शेतीचे नियोजन सर्व प्रकारच्या रसायनांचा (खते, पशुखाद्यपुरके, पीक संरक्षक औषधे, संप्रेरके, इत्यादी) वापर टाळून केलेली एकात्मिक शेती पध्दती ज्यात पशुधन व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करुन शेतावरील व स्थानिकरित्या उपलब्ध स्त्रोतांचा वापर केला जातो." (आयफॉम)**

अशी एक शेती पध्दती की, **"ज्यामध्ये शेतीची रचना व व्यवस्थापनापासून अशी निसर्गप्रणाली निर्माण करणे की, ज्यामुळे शेतीची शाश्वत उत्पादकता, रासायनिक खते व कीडनाशक औषधांच्या वापराशिवाय टिकविता येईल. (अपेडा)**

www.mahaagri.gov.in

<u>सेंद्रिय शेती धोरणाची उद्दिष्टये-</u>

- कृषि उत्पादनासाठी जमीन हे सजीव माध्यम आहे. त्याची जैवविविधता जोपासून जमिनीचे आरोग्य सुधारणे तसेच विविध माध्यमांद्वारे होणारे जमिन, पाणी व हवा यांचे होणारे प्रदुषण नियंत्रण करणे .
- सेंद्रिय निविष्ठा यांचे गाव पातळीवर उत्पादन होण्यासाठी **"सेंद्रिय निविष्ठा ग्राम "** हि संकल्पना पुर्ततेकरीता स्वयंसहाय्यता गट किंवा शेतक-यांची कंपनी इत्यांदीना प्रोत्साहन देणे.
- शहरातील जैविक घनकच-याचा पुर्नवापर व त्यापासून उत्पादने करुन शहरांत किंवा शहरालगतच्या शेतीला प्रोत्साहन देणे.
- सेंद्रिय शेती हा कृषि व्यवसाय म्हणून विकसित करण्यासाठी आर्थिक, संस्थात्मक व बाजारपेठांसाठी मदत करणे.
- सकस रसायनमुक्त आणि मूल्यवर्धित सेंद्रिय शेती उत्पादन करणे.
- शेतीमधून तयार होणारे कृषि पिक अवशेष आणि टाकावू वनस्पतीजन्य पदार्थांचा पुर्न:वापर करण्यासाठी विविध सेंद्रिय पध्दती तसेच यंत्र, अवजारे यांचेसाठी प्रोत्साहन देणे.
- सेंद्रिय उत्पादनाचे मुल्यवर्धन करणेसाठी त्यांची प्रतवारी, प्रक्रिया, पॅकिंग व शितीकरणसाठी सहाय्यता देणे

सेंद्रिय शेतीची व्याप्ती-

- **एकात्मिक सेंद्रिय ग्राम** व **सेंद्रिय निविष्ठा ग्राम** संकल्पना राबविणे.
- सेंद्रिय उत्पादनांना देशांतर्गत व परदेशी बाजारपेठ मिळविण्यासाठी पणन व्यवस्थापन, ब्रॅंडिंग (नामांकन) प्रक्रिया व साठवणूक तसेच वाहतूक यासाठी मदत करणे.
- सेंद्रिय शेतीच्या प्रमाणिकरणासाठी सहाय्य करणे.
- आदिवासी व डोंगरी भागातील क्षेत्रांना सेंद्रिय क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सहाय्यभूत अनुदान देणे.
- शहरी भागातील ओला वनस्पतीजन्य व घन कचरा यांचेवर प्रक्रिया करणे व शहरालगतच्या शेतीला व नागरी शेतीला सेंद्रिय खत पुरविणे.
- सेंद्रिय निविष्ठा उत्पादन करणा-या संस्थांना, स्वयंसहाय्यता गटांना व उत्पादकांना सहाय्यता करणे.

सेंद्रिय शेती उपक्रम –

अ) सेंद्रिय शेती प्रचार, प्रसिध्दी

सेंद्रिय शेतीच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी प्रचार साहित्य उदा. भित्तीपत्रके, पुस्तके, चलचित्रफिती, चित्रफिती निर्माण करणे, होर्डींग लावणे, सेंद्रिय शेत मालाचे प्रदर्शन भरवणे, जिंगल्सच्या माध्यमातून प्रसिध्दी इत्यादी.

- संकेत स्थळ निर्माण करणे
- सेंद्रिय शेती पुरस्कार प्रदान करणे

www.mahaagri.gov.in

ब) मनुष्यबळ विकास -

- शेतक-यांचे सेंद्रिय समुह/गट याची स्थापना करणे..
- शेतक-यांसाठी शेतकरी मेळावे, शेतीशाळा, परसबाग प्रशिक्षण, राज्यांतर्गत व राज्याबाहेर अभ्यास दौरे आयोजित करणे
- सेंद्रिय शेतीमाल ग्राहक व विक्रेत्यांसाठी खास प्रशिक्षण आयोजित करणे
- अधिकारी/कर्मचा-यांसाठी कार्यशाळा व प्रशिक्षण आयोजित करणे
- यशस्वी शेतक-यांच्या शेतावर सेंद्रिय शेती बहुविध प्रशिक्षण केंद्र उभारणे.

क) सेंद्रिय शेती निविष्ठा निर्मिती व उपलब्धता

- सेंद्रिय निविष्ठांचे गाव पातळीवर उत्पादन करणेसाठी सेंद्रिय निविष्ठा ग्राम संकल्पना राबविणे
- सेंद्रिय निविष्ठा उदा.गांडूळ खत, बायोडायनामिक कंपोस्ट, सीपीपी, जैविक रोग व कीटकनाशके आणि वनस्पतीजन्य किडनाशके (दशपर्णी अर्क) इत्यांदीचे उत्पादन करणे.
- गांडूळ बिजोत्पादन युनिटची उभारणी करणे.
- द्रवरुप जीवाणूखते उदा. ॲझोटोबॅक्टर,रायझोबियम, स्फुरद विरघळविणारे जिवाणू, सुडोमोनास, ॲसिटोबॅक्टर इत्यादींची निर्मिती करणे.
- जैविक रोग किडनाशके निर्मिती
- स्थानिक सेंद्रिय निविष्ठा उदा. जीवामृत, बीजामृत, पंचगव्य, अमृतपाणी इत्यादीचे उत्पादन करणे
- सेंद्रिय निविष्ठांसाठी बांधावर गिरीपुष्प, करंज, कडूनिंब इत्यादीची लागवड करणे.
- हिरवळीच्या खतांची पिके ताग, धैचा, गिरीपुष्प इत्यादीची लागवड करणे.
- पिक अवशेषांचा पुर्नवापर करणे
- निंबोळी पावडर तयार करणे
- सेंद्रिय निविष्ठांच्या गुणवत्ता व किमतीं नियंत्रणासाठी गुणनियंत्रण या यंत्रणेचे बळकटिकरण करणे त्यासाठी विभागीय स्तरावर एका कृषि अधिका-याची नेमणूक करणे.
- सेंद्रिय निविष्ठांचे गुणवत्तेचे निकष निश्चित करुन त्याचे गुणनियंत्रणाची अंमलबजावणी करणे.

ड) सेंद्रिय शेतीचे प्रमाणिकरण-

- सेंद्रिय शेती प्रमाणिकरण

इ) सेंद्रिय शेती विक्री व प्रक्रिया

- कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये स्वतंत्र सेंद्रिय कृषि माल साठवणूक व विक्री केंद्र निर्माण करणे.
- प्रमाणिकरणाचे कार्य बीज प्रमाणिकरण यंत्रणेचे बळकटीकरण करुन करणे
- पारंपारीक सेंद्रिय उत्पादन करणारा भाग (डोंगरी व आदिवासी) व तेथिल वैशिष्टपुर्ण उत्पादने निर्देशित करुन त्यांचे नामांकन करण्यास प्रोत्साहन देणे.

www.mahaagri.gov.in

- सेंद्रिय शेतीमाल महोत्सव आयोजित करणे.
- सेंद्रिय शेतीच्या खास माहितीकरीता संकेतस्थळ निर्माण करणे
- सेंद्रिय शेती मालाची काढणी, हाताळणी, शितकरण, ग्रेडींग व पॅकिंगसाठी प्रोत्साहन देणे.
- सेंद्रिय शेतीमाल थेट विक्रीस प्रोत्साहनासाठी वाहतूक अनुदान देणे .
- सेंद्रिय शेतीमाल विक्री केंद्र स्थापनेसाठी अनुदान देणे.
- सेंद्रिय शेतीमाल प्राथमिक प्रक्रिया उद्योगास चालना देणे
- प्रत्येक जिल्हयातून आत्माच्या माध्यमातून ब्रँड विकसित करणे
- जिल्हास्तरावर साप्ताहिक सेंद्रिय शेतीमाल बाजार भरविणे.
- सेंद्रिय शेती माल बाजारपेठेचा अभ्यास करुन प्रसिध्दी देणे.

ई) सेंद्रिय शेती शिक्षण व संशोधन

- सेंद्रिय शेती पध्दतीचे संशोधन करुन उत्पादन पध्दतीच्या शिफारशीसाठी चारही कृषि विद्यापीठांत स्वतंत्र **सेंद्रिय शेती विभागाची** स्थापना करणे.
- शैक्षणिक अभ्यासक्रमांतर्गत सेंद्रिय शेती या विषयाचा समावेश करणे.
- सेंद्रिय शेतीबाबत पदविका अभ्यासक्रम (एक वर्ष), पदव्युत्तर अभ्यासक्रम (एम.एससी., पी.एच.डी.) सुरु करणे.
- जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी पिक पध्दतीद्वारा शिफारस करणे
- कृषि विद्यापीठानी प्रचलित/ पारंपारीक पध्दतीचा अभ्यास करुन शिफारशी करणे.

सेंद्रिय शेती कक्ष –

राज्यस्तरावर संचालक, फलोत्पादन, विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक व जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या अधिनस्त सेंद्रिय शेती कक्षाची स्थापना करण्यात येईल.

सेंद्रिय शेती कक्ष

राज्यस्तर - मा. संचालक फलोत्पादन यांचे अधिनस्त आयुक्तालय स्तरावर स्वतंत्र **सेंद्रिय शेती कक्ष** स्थापन करण्यात येईल.

१) अधिक्षक कृषि अधिकारी- १
२) तंत्र अधिकारी- १
३) कृषि अधिकारी - ३
४) कृषि सहाय्यक - ३
५) संगणक ऑपरेटर - १
६) वरीष्ठ लिपिक - १
७) लिपीक -२
८) शिपाई – १

www.mahaagri.gov.in

विभागस्तर- विभागीय कृषि सहसंचालक यांचे अधिनस्त **सेंद्रिय शेती कक्ष-**

१) तंत्र अधिकारी- १

२) कृषि पर्यवेक्षक- २

३) लिपीक - १

४) संगणक ऑपरेटर- १

जिल्हास्तर – जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे अधिनस्त **सेंद्रिय शेती कक्ष**

१) कृषि अधिकारी- १

२) कृषि सहाय्यक- १

३) लिपीक, संगणक ऑपरेटर-१

सेंद्रिय शेतीस चालना देण्यासाठी सनियंत्रण व आढावा-

- सेंद्रिय शेतीचा सर्वांगिण विकास, समन्वय व संनियंत्रण ठेवणेसाठी राज्य स्तरावर **सेंद्रिय शेती विकास सुकाणू समिती** स्थापन करणे.

मा. कृषि मंत्री,	अध्यक्ष
मा.कृषि राज्यमंत्री	उपाध्यक्ष
मा. प्रधान सचिव (कृषि व फलोत्पादन)	सदस्य
मा. सचिव (सहकार)	सदस्य
मा. सचिव (पशुसंवर्धन व दुग्धविकास)	सदस्य
मा. सचिव (सामाजिक वनीकरण)	सदस्य
मा. सचिव (ग्रामविकास)	सदस्य
चारही कृषि विद्यापीठाचे कुलगुरु	सदस्य
आयुक्त (कृषि)	सदस्य
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ	सदस्य
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ	सदस्य
व्यवस्थापकीय संचालक (राफअ)	सदस्य
संचालक (विस्तार व प्रशिक्षण)	सदस्य
संचालक (नि व गुणनियंत्रण)	सदस्य
संचालक (कृषि प्रक्रिया व व्यापारक्षम शेती)	सदस्य
संचालक (फलोत्पादन)	सदस्य सचिव
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सेंद्रिय शेती धोरण समिती	सदस्य
अपेडाचे प्रतिनिधी	सदस्य
कृषि विभागातील सेंद्रिय शेतीतील अनुभवी अधिकारी (४)	सदस्य
राष्ट्रीयकृत बँकेचे प्रतिनिधी	सदस्य
सेंद्रिय शेतीमध्ये उल्ल्ेखनिय काम करणा-या संस्था (दोन)	सदस्य
सेंद्रिय शेतीमध्ये कार्य करणारे शेतकरी (पाच)	सदस्य
सेंद्रिय शेतीमध्ये कार्य करणा-या महिला (दोन)	सदस्य

www.mahaagri.gov.in

सदरील समितीची बैठक वर्षातून कमीत कमी दोन वेळा आयोजित करण्यात येईल आणि या समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे असेल.

१ राज्य, विभाग व जिल्हास्तरावर सेंद्रिय शेती समितीची स्थापना करणे

२ सेंद्रिय शेती कार्यक्रमाचा आढावा घेणे

३ सेंद्रिय शेती क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे शेतकरी, संस्था, गट, अधिकारी, शास्त्रज्ञ यांची पुरस्कारासाठी निवड करणे.

४ सेंद्रिय शेती कार्यक्रमास मंजूरी प्रदान करणे

५ सेंद्रिय शेती संबंधात धोरणात्मक निर्णय घेणे.

- सेंद्रिय शेतीचा सर्वांगिण विकास, समन्वय व व संनियंत्रण ठेवणेसाठी आयुक्तालय स्तरावर **कार्यकारी समितीची** स्थापना करणे

आयुक्त कृषि	अध्यक्ष
आयुक्त (पशुसंवर्धन व दुग्धविकास)	सदस्य
आयुक्त (सहकार)	सदस्य
व्यवस्थापकीय संचालक (राफअ)	सदस्य
संचालक (विस्तार व प्रशिक्षण)	सदस्य
संचालक (नि व गुणनियंत्रण)	सदस्य
संचालक (कृषि प्रक्रिया व व्यापारक्षम शेती)	सदस्य
संचालक (फलोत्पादन)	सदस्य सचिव
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सेंद्रिय शेती धोरण समिती	सदस्य
कृषि विभागातील सेंद्रिय शेतीतील वरीष्ठ अधिकारी	सदस्य
राष्ट्रीयकृत बँकेचे प्रतिनिधी	सदस्य
सचांलक (सामाजिक वनीकरण)	सदस्य
सचांलक (पणन)	सदस्य
महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, प्रतिनिधी	सदस्य
महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ , प्रतिनिधी	सदस्य
चारही कृषि विद्यापीठातील सेंद्रिय शेतीशी निगडीत शास्त्रज्ञ	सदस्य
सेंद्रिय शेतीमध्ये काम करणा-या संस्था (दोन)	सदस्य
सेंद्रिय शेती करणारे शेतकरी (पाच)	सदस्य
सेंद्रिय शेतीमध्ये कार्य करणा-या महिला (दोन)	सदस्य

www.mahaagri.gov.in

सेंद्रिय शेती - अभियान - २०१०-२०१५

सन २००९-१० पर्यत सेंद्रिय शेतीखाली ६.५० लाख हेक्टर क्षेत्र आलेले आहे.त्यापैकी १.२९ लाख हेक्टर क्षेत्राचे प्रमाणिकरण झालेले आहे. येत्या पाच वर्षात सेंद्रिय शेतीस चालना देण्यासाठी सेंद्रिय शेती अभियान २०१५ कार्यक्रम राबविण्यात येऊन सेंद्रिय शेतीखालील क्षेत्र १० लाख हेक्टर व प्रमाणिकरणाचे क्षेत्र ५ लाख हेक्टर वाढविण्याचे उदिष्ट ठरविण्यात आलेले आहे.

सेंद्रिय शेतीचा क्षेत्र विस्तार करुन सेंद्रिय उत्पादन घेण्यासाठी विविध माध्यमातून प्रचार व प्रसिध्दी, अभ्यासदौरे, कार्यशाळा आयोजित करणे, सेंद्रिय शेतीमालाबाबत ग्राहकांमध्ये जागृती निर्माण करणे, सेंद्रिय निविष्ठांची उपलब्धता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देणे, शहरी भागातील ओला वनस्पतीजन्य व घनकचरा यापासून सेंद्रिय खत निर्मितीस प्रोत्साहन देणे, सेंद्रिय शेतीचे उत्पादन, प्रमाणिकरण, विक्री सुलभ होणेसाठी समुह /गट पध्दतीस प्राधान्य देण्यात येईल. प्रत्येक गटात १०-१५ लाभार्थी असतील व त्याचे क्षेत्र १० हेक्टर असेल अशा प्रकारचे १६,००० गट प्रति वर्षी याप्रमाणे ८०,००० सेंद्रिय शेती गटाची स्थापना करण्यात येईल. ज्या गावांत १० गट तयार होतील त्या गावात सेंद्रिय निविष्ठा ग्राम ही संकल्पना राबविण्यात येईल व सेंद्रिय निविष्ठा उत्पादनासाठी प्रकल्पाधारित कार्यक्रम मंजूर करण्यांत येईल.

संपर्क

संचालक फलोत्पादन

कृषि उपसंचालक,फलो-३

कृषि आयुक्तालय महाराष्ट्र राज्य

पुणे- ४११ ००५

फोन/फॅक्स : ०२०-२५५३७९५७/०२०-२५५३७५६५

Email :organicfarming_horti8@rediffmail.com

Contact

Director Horticulture

Dy.Dir.Hort-3

Commissionerate of Agriculture, M.S.Pune-411005

Phone No. : 020-25537957

Fax : 020-25537565

Email : organicfarming_horti8@rediffmail.com

www.mahaagri.gov.in